पशुधन

# हिवाळ्यात दुधाळ जनावरांचे संगोपन असे करा




**डॉ. स्मिता कोल्हे**
(मो.नं. ९९७०४२५३८९)
**डॉ. राहुल कोल्हे**
के.एन.पी. कॉलेज ऑफ व्हेटरनरी सायन्स,
शिरवळ, जि. सातारा






हिवाळ्यामध्ये गोचिड, पिसवा, खरजेचे किडे यांसारख्या बाह्य परजीवींचा प्रादुर्भाव होतो. हे बाह्य परजीवी जनावरांचे रक्त शोषण करतात. यामुळे जनावरांमध्ये पोषक द्रव्यांची कमतरता व रक्ताल्पता होते. याशिवाय हे परजीवी विविध प्रकारचे रोगजंतू वाहून नेतात. त्यामुळे रोग एका जनावरापासून दुसऱ्या जनावरामध्ये पसरतो. यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करावे.

हिवाळा हा ऋतू जनावरांच्या वाढीसाठी अत्यंत पोषक आणि उपयुक्त आहे. या काळात पाण्याची भरपूर उपलब्धता असते तसेच मुबलक हिरवा आणि वाळलेला चाराही असतो. त्यामुळे योग्य ती काळजी घेतली तर हा चांगला ऋतू आहे.

* या ऋतूत जनावरांच्या चयापचयाची- शरीरक्रियांची गती कमी होऊ नये म्हणून ऊर्जायुक्त आहार जनावरांना देणे गरजेचे असते.

* हिवाळ्यातील गार वारे व थंडीमुळे जनावरांना फुफ्फुसदाह, श्वसनाचे विकार होतात, म्हणून योग्य ती दक्षता घ्यावी. आहारात कॅल्शियमचे प्रमाण वाढवावे. जनावरांचा थंडीपासून बचाव करावा.

* गोठ्यामध्ये उबदारपणा राहाण्यासाठी जास्त शक्तीचे विद्युत दिवे लावावेत. गोठ्याच्या जाळीला पोते बांधावे. त्यामुळे गोठ्यामध्ये गार हवा येणार नाही.



* जनावरांना सकाळच्या कोवळ्या उन्हामध्ये बांधावे. या उन्हातून 'ड' जीवनसत्त्वाचा देखील पुरवठा होतो.

* जनावरांच्या दैनंदिन शारीरिक क्रिया व्यवस्थितपणे होण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते, म्हणून तेव्हा जनावरांना पुरेसे स्वच्छ पाणी पाजावे.

* पावसाळ्यात वाढीस लागलेल्या जनावरांना पोषक वातावरण, हिरवा चारा मिळत असल्यामुळे हिवाळ्यात ती धष्टपुष्ट होतात. या काळात जनावरांची क्षय, सांसर्गिक गर्भपातविषयक तपासणी करावी.

* हिवाळ्यात जनावरे माजावर येतात का याकडे लक्ष द्यावे. जनावरांचा माज ओळखण्यासाठी सकाळी जनावरे गोठ्यात उभी राहाण्यापूर्वी तर सायंकाळी गोठ्यात परतलेली जनावरे बसल्यानंतर बळस, सोट टाकतात का याचे निरीक्षण दररोज करावे. माजावर आलेली जनावरे लक्षात आल्यास त्यांना योग्य वेळी कृत्रिम रेतन करावे. जनावरांकडे लक्ष ठेवूनही त्यांचा माज लक्षात न आल्यास अशा गायी, म्हशींची पशुवैद्याकडून आरोग्य तपासणी करावी.

* या काळात गोठा जास्त धुवू नये, मल-मूत्राचा निचरा तत्काळ करावा.

* हिवाळ्यात जनावरांना थंडीपासून बचाव करण्यासाठी शरीर उबदार ठेवावे लागते. याकरिता जनावरांच्या शरीरातून जास्त प्रमाणात ऊर्जा वापरली जाते. यासाठी जनावराला जास्तीचा खुराक द्यावा लागतो. या ऊर्जेची कमतरता भरून काढण्यासाठी नेहमीच्या खुराकापेक्षा ५ ते १० टक्के जास्त प्रमाणात खुराक जनावराला द्यावा. यासोबतच योग्य मात्रेत खनिज क्षारांचा पुरवठा करावा. या काळात शिफारशीनुसार मात्रेमध्ये मिठाचा वापर करणे उपयुक्त ठरते. याशिवाय उपलब्धतेनुसार योग्य प्रमाणात हिरवा चारा, बरसीम जनावरांना द्यावा.

* दुभत्या जनावरांना दूध उत्पादन व दैनंदिन शारीरिक गरज भागविणे या दोन उद्देशांसाठी पोषणाची आवश्यकता असते. त्यामुळे त्यांना जास्तीचा आहार शिफारशीप्रमाणे द्यावा. त्याचप्रमाणे गाभण जनावरांना देखील गर्भाच्या विकासासाठी शिफारशीप्रमाणे योग्य प्रमाणात आहाराची गरज असते.

* बहुतेक जनावरे विशेषत: म्हशी हिवाळ्यात माजावर येतात. त्यामुळे हिवाळ्यात आपल्या कळपातील जनावरांवर लक्ष ठेवावे. म्हशींमध्ये मुका माज आढळून येतो, तो लवकर लक्षात येत नाही. यासाठी म्हशींच्या माजाकडे विशेष लक्ष द्यावे. माजावर आलेल्या जनावरांना नैसर्गिक किंवा कृत्रिम रेतन करावे. * हिवाळ्यामध्ये गोचिड, पिसवा, खरजेचे किडे यांसारख्या बाह्य परजीवींचा प्रादुर्भाव होतो. हे बाह्य परजीवी जनावरांचे रक्त शोषण करतात. यामुळे जनावरांमध्ये पोषक द्रव्यांची कमतरता व रक्ताल्पता होते. याशिवाय हे परजीवी विविध प्रकारचे रोगजंतू वाहून नेतात. त्यामुळे रोग एका जनावरापासून दुसऱ्या जनावरामध्ये पसरतो. यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करावे. * बाह्य परजीवींपासून बचाव करण्यासाठी जनावरांना खरारा करावा. यामुळे शरीरावरील बाह्य परजीवी गळून पडतात. त्वचा चमकदार दिसते. गोठ्याच्या फटीत हे बाह्य परजीवी लपून बसतात. त्यामुळे गोठ्याच्या कानाकोपऱ्यामध्ये शिफारशीनुसार गोचिडनाशकांची फवारणी करावी. यावेळी गोठ्यात जनावरे नसावीत. * पावसाळ्यातील अस्वच्छ पाण्यामुळे झालेले पोटातील परजीवी कमी करण्यासाठी जंतनाशक औषधांची मात्रा जनावरांना हिवाळ्याच्या सुरवातीस द्यावी. * वासरांना हिवाळ्यात उबदार ठिकाणी ठेवावे. * थंडीचा परिणाम बघून दोहनाच्या व चरण्याच्या वेळेत बदल करावा. ■